मंत्रालयीन सेवा

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग, मुख्य इमारत,

दुसरा मजला,मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२०४८३२५

Email ID: pol6a.home@nic.in

क्र: संकीर्ण- १४२३/प्र.क्र.०४/पोल-६अ,

दिनांक :- १९/०४/२०२४

## जाहिरात- मुदतवाढ

**विषय : महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ अन्वये प्राप्त अपिलावर सुनावणीसाठी अपिलीय प्राधिकरी यांना सहाय्य करण्याकरीता सेवानिवृत अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज करण्यास मुदतवाढ**

**संदर्भ : शासन समक्रमांक जाहिरात पत्र दि. २६.०२.२०२४**

महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ अन्वये प्राप्त अपिलार्थी पोलीस कर्मचारी /अधिकारी यांना क्षेत्रिय कार्यालयाने दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने दाखल केलेल्या अपिलावरील सुनावणी गृह विभागात घेण्यात येतात. सदर अपीलावरील सुनावणीकरीता प्रधान सचिव ( अपील व सुरक्षा ) गृह हे सक्षम प्राधिकारी आहेत. अपिलार्थी यांच्या सुनावणीबाबतची प्रकरणे मोठया प्रमाणात प्रलंबित आहेत. सदर अपील निकाली काढण्यास विलंब होत आहे. यास्तव,अपिल प्रकरणात सक्षम प्राधिकारी यांना मदत करण्यासाठी उक्त संदर्भाधीन पत्रान्वये सेवानिवृत्त उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी यांचेकडून इच्छुकता मागविण्यात आली आहे. त्यानुषंगाने इच्छूक सेवानिवृत अधिका-यांनी दि. ३० एप्रिल २०२४ पर्यंत त्यांची इच्छुकता खालील नमूद केलेल्या ई-मेल पत्यावर विहित नमुन्यात पाठवावी. (अर्जाचा विहित नमुना 'शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

ई-मेल :- gajanan.gurav@nic.in

सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(गजानन गुरव)

उपसचिव, गृह विभाग

प्रत : निवडनस्ती, कार्यासन पोल-६.

मंत्रालयीन सेवा
जनहितार्थ सर्वदा

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग, मुख्य इमारत,
दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
Email ID: pol6a.home@.gov.in

क्र: संकीर्ण- १४२३/प्र.क्र. ०४ /पोल-६ अ, दिनांक :- २६ /०२/२०२

# जाहिरात

**विषय :- महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम, १९५६ अन्वये प्राप्त व इतर अपिलांवर सुनावणीसाठी अपिलीय प्राधिकारी यांना सहाय्य करण्याकरिता सेवानिवृत अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.**

महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपिल) नियम, १९५६ अन्वये अपिलार्थी पोलीस कर्मचारी / अधिकारी यांना क्षेत्रिय कार्यालयाने दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने व इतर नियमानुसार अपीले गृह विभागास प्राप्त होतात. सदर अपिलावरील सुनावणी शासनस्तरावर घेण्यात येतात. या अपिल प्रकरणात सक्षम प्राधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे. सदर पदाची अर्हता व कामाचे स्वरूप खालील प्रमाणे राहिल:

| पद | अर्हता | कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| अपिलीय प्राधिकारी यांचे सहायक (पद संख्या-०१) | १) वेतन श्रेणी :- वेतन स्तर (level) — १० / ११ / १२<br>२) वय :- इच्छुक अधिकाऱ्याचे वय ७० वर्षापेक्षा कमी असावे.<br>३) केंद्र सरकार व राज्य शासनाच्या सेवेतील सेवानिवृत्त झालेले उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी दर्जाचा अधिकारी.<br>४) विभागीय चौकशीची प्रकरणे हाताळण्याचा अनुभव आवश्यक<br>५) मराठी व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे आवश्यक.<br>६) मराठी दस्तऐवज इंग्रजीमध्ये भाषांतरित करता येणे आवश्यक.<br>७) सेवानिवृतीनंतर सद्य:स्थितीत अन्य आस्थापनेवर कार्यरत नसावा. | १) अपिलीय प्राधिकारी यांना अपिलांच्या सुनावणीवेळी सहाय्य करणे.<br>२) मराठी भाषेतील कागदपत्रांचा इंग्रजीमध्ये अनुवाद करणे. |

निवड झालेल्या सेवानिवृत अधिकाऱ्याचे मानधन हे सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग-०१)/१३, दि. ०८ सप्टेंबर, २०२३ नुसार त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी

मिळत असलेले मूळ निवृतीवेतन (अंशराशीकरण मूल्य विचारात न घेता) त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल.

गृह विभागाने सोपलेल्या अपिलावरील सुनावणी प्रकरणांच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या अटी व शर्ती निवड झालेल्या अधिकाऱ्यावर बंधनकारक राहतील. इच्छूक सेवानिवृत अधिकाऱ्यांनी सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत त्यांची इच्छुकता खालील नमूद केलेल्या ई-मेल पत्यावर विहित नमुन्यात पाठवावी. (अर्जाचा विहित नमुना 'शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

**ई-मेल :- gajanan.gurav@nic.in**

सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(गजानन गुरव)
**उप सचिव, गृह विभाग**

## अर्जाचा नमुना

१) अधिकाऱ्याचे नांव :-

२) ज्या पदासाठी इच्छूक आहात ते पद :- चौकशी अधिकारी /
सादरकर्ता अधिकारी/
चौकशी अधिकारी यांचे सहायक
*(वरीलपैकी इच्छूक पर्यायावर टिक करावे)*

३) पत्ता :-

४) मोबाईल क्रमांक :-

५) ई-मेल आय. डी. :-

६) जन्म दिनांक :-

७) दि.१.१.२०२४ रोजीचे वय :-

८) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

९) सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद व पे-स्केल :-

१०) सेवानिवृत्तीपूर्वी घेतलेले शेवटचे वेतन :-

११) सध्या सेवानिवृत्ती वेतन :-

१२) ज्या विभागातून सेवानिवृत्त झाले तो विभाग / कार्यालय :-

१३) विभागीय चौकशीच्या कामाचा अनुभव :-

१४) विभागीय चौकशी मध्ये पूर्ण केलेल्या कामाचा सविस्तर तपशील:-

१५) सेवेत असताना झालेली शिक्षा किंवा
विभागीय चौकशीस सामोरे गेले आहेत किंवा कसे :-

१६) असल्यास, त्याचा सविस्तर तपशील :-

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**